# एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे

## 'प्रपत्र अ'

| अक्र. | पोलीस ठाणे/ पोलीस शाखा | गु.र.क्र. व कलम | बळीत व्यक्तीचे नावं/ तपशील | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | कोणी उघडकीस आणला (पोलीस ठाणे/शाखा येथील तपासी पथकातील अधिकारी/अंमलदार यांची संपूर्ण नावे व बक्कल क्रमांक तपशिल) | तपासाचे वैशिष्टय (संबधीत पथकाचे उत्कृष्ठ कौशल्य कशा प्रकारे दिसून आले) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०९ |
| ०१ | एम.आय. डी.सी. पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. २५१/२०२० कलम ४५४, ४५७, ३८०, १०९, १२०(ब), ३४ भा.द.वि. | श्री. राजकुमार तिलकराज लुथरा, वय ५७ वर्षे, धंदा–व्यवसाय , रा.ठि.– ६०२/ १०, लोढा एटर्निस, भंगारवाडी, एमआयडीसी अंधेरी पुर्व, मुंबई. | फिर्यादी श्री. राजकुमार तिलकराज लुथरा यांची सोना ओव्हरसिज, गाळा नं. ११०, निरज इन्डस्ट्रिज इस्टेट, सनफार्मा समोर, महाकाली रोड, अंधेरी पुर्व, मुंबई याठिकाणी हिरे जडीत सोन्याचे दागिने बनविण्याची कंपनी असून दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० चे दरम्यान लॉकडाऊनचे कालावधीत अज्ञात इसम याने कंपनीच्या छताचा सिमेंटचा पत्रा तोडून, आत प्रवेश करुन, ग्राईंडर कटरच्या सहाय्याने तिजोरी कापून, त्यातील मालमत्ता रुपये ७,०९,४८,९९२/– (सात करोड नऊ लाख अठ्ठेचाळीस हजार नवशे ब्याण्णव रु.) चे सोने– हिऱ्याचे दागिने व हिरे तसेच सोने मिश्रीत माती घरफोडी करुन चोरुन नेली म्हणून यातील फिर्यादी यांनी दिनांक | १. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शिंदे – सुचना व मार्गदर्शन<br>२. पोलीस निरीक्षक (गुन्हे), दिपक सुर्वे – तपास अधिकारी<br>३. स.पो.नि देवीदास मुपडे<br>४. पो.उ.नि.विजय आचरेकर<br>५. पो.उ.नि. गणेश मोहिते<br>६. पोनाक्र. ३३६०३/शंकर काळे<br>७. पोनाक्र. ९७०१७३/बंडू सावंत,<br>८. पोनाक्र. ९७०७३२/ देविदास सोनावणे,<br>९. पोशिक्र. ०४.०७९१/ विनोद मलतवाडकर,<br>१०.पोशिक्र. ०६१३१९/ | माहिती स्वतंत्र पानावर जोडली आहे. | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २२/०४/२०२० रोजी एम.आय. डी.सी. पोलीस ठाणेस येवून दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. | संभाजी काळे<br>११.पोशिक्र. ०७०८३६/ ज्ञानेश्वर गोसावी,<br>१२.पोशिक्र. ०७०९६४/ शिवप्रसाद पवार,<br>१३.पोशिक्र. ०९०७३८/ प्रदिप चव्हाण,<br>१४.पोशिक्र. ०९१५७८/ प्रसाद वरे<br>१५.पोशिक्र. ११०१३८/ सुहास पवार<br>(सर्व नेमणूक एम.आय.डी. सी. पोलीस ठाणे, अंधेरी पुर्व, मुंबई) | | |

## ‘प्रपत्र अ’ मुद्‌दा क्र. ७ :— तपासाचे वैशिष्टय

नमुद घरफोडीचा गुन्हा दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० रोजीचे दरम्यान लॉकडाऊनचे कालावधीत घडला असून गुन्हयातील पाहिजे आरोपी हे अज्ञात असून त्यांनी गुन्हा करताना इलेक्ट्रीक लोखंड कटर मशिनचा वापर करून लोखंडी तिजोरी कापल्याचे दिसून आले. दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० रोजीचे दरम्यान नक्की कोणत्या दिवशी सदरची घरफोडी चोरी झाली आहे याची माहिती मिळणे आवश्यक होते. त्याकरीता प्रथम कंपनीला विदयुत पुरवठा करणारे टाटा पावर विदयुत कंपनीत जावून तपास केला असता, दिनांक ०६/०४/२०२० रोजी कंपनीचे विदयुत मिटरचे रिडींग सकाळी ०७.३० वा. ते दुपारी १२.३० वा. चे दरम्यान जलद गतीने चालू असल्याचे दिसून आले. लॉकडाऊनचे कालावधीत कंपनी बंद असताना दिनांक ०६/०४/२०२० रोजी अशा पध्दती विदयुत मिटर जलद गतीने सुरू असल्याचे दिसून आल्याने सदरची घरफोडी चोरी ही दिनांक ०६/०४/२०२० रोजी झाल्याबाबत नक्की झाले. फिर्यादी यांचे कंपनीत अज्ञात चोरटयांनी ज्या पध्दतीने प्रवेश करून चोरी केली होती. त्या पध्दतीवरून कंपनीचा माहितीगार व्यक्तीचा देखील सदर गुन्हयात सहभाग असल्याची दाट शक्यता वाटल्याने, कंपनीत सध्या काम करणारे एकूण ३५ ते ४० कामगार/कर्मचारी व पुर्वी काम करणारे कामगार/कर्मचारी असे सर्वांकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करण्यात आला. तपासामध्ये फिर्यादी यांचे कंपनीत सुमारे ०२ वर्षापूर्वी प्युन म्हणून काम करणारा पंकज रामनिवर गौड वय ३५ वर्षे, रा. ठि. जे.व्हि.एल.आर., पवई मुंबई हा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचे राहते परिसरातून कुठेतरी निघून गेल्याचे समजले. परिसरातील खात्रीशिर बातमीदार यांचेकडून नमुद पंकज गौड हा इसम नामे विपुल आनंद चाबरिया याचे श्री एकता फाऊंडेशन या NGO मध्ये काम करत असल्याचे समजल्याने NGO चे संस्थापक विपूल चाबरिया यांचेकडे पंकज गौड तसेच गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्वक व शिताफिने तपास केला असता, विपूल चाबरिया याने फिर्यादी यांचे कंपनीत पुर्वी काम करणारा पंकज गौड व फिर्यादी यांचे कंपनीत सध्या काम करणारा धिमंत छोटालाल चौहाण व त्यांचे इतर साथिदार यांनी सदर घरफोडी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने इतर पाहिजे आरोपीतांचा शोध घेऊन नमुद गुन्हयात १) विपुल आनंदा चांबरिया, वय ३५ वर्षे, २) लक्ष्मण नरसप्पा दंडू, वय ३५ वर्षे, ३) शंकर कुमार येशु, वय ४२ वर्षे, ४) राजेश शैल्लु मारपक्का, वय २९ वर्षे, ५) विकास तुळशीराम चनवादी, वय २४ वर्षे, ६) मुन्नाप्रसाद हिरालाल खैरवार, वय ४९ वर्षे, ७) धिमंत छोटालाल चौहाण वय ३२ वर्षे, ८) इरफान लतीफ मुलाणी. वय ३४ वर्षे, ९) संतोष बापूराव राठोड, वय ३५ वर्षे, १०) पंकज रामनिवर गौड, वय ३५ वर्षे यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने यातील अटक आरोपीतांकडे वैयक्तीक कौशल्यपुर्ण तपास करून पोलीस कोठडी कालावधीमध्ये रूपये ३,८२,७३,७२५/— किंमतीचे हिरे, रूपये २,१९,०४०७२/— किंमतीचे हिरेजडीत सोन्याचे दागिने, रूपये ४४,९१,५००/— किंमतीचे गोल्ड डस्ट असे एकुण रूपये ६,४६,६९,२९७/— ( सहा करोड सेहेचाळीस लाख एकोणसत्तर हजार दोनशे सत्याण्णव रुपये) किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. तसेच गुन्हा करते वेळी वापरण्यात आलेले ग्राईडर कटर मशीन किंमत रुपये २,०००/— व अॅक्टीव्हा स्कुटर नं. MH 48 AR 0041 किंमत रूपये ३०,०००/—, अॅक्टीव्हा स्कुटर नं. MH 47 S 2840 किंमत रूपये ३०,०००/— इत्यादी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हा दिनांक २२/०४/२०२० रोजी दाखल झाला असून कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नसताना दिनांक २७/०४/२०२० रोजी सदरचा गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालमत्तेपैकी ९१.१५ टक्के मालमत्ता हस्तगत करण्यास तपासी पथकास यश आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू असून, गुन्हयातील इतर चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करीत आहोत.

टिप :–

गुन्हयाचे तपासात अटक आरोपी संतोष बापूराव राठोड हे ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई येथे पोलीस नाईक पदावर कार्यरत असून त्यांचा बक्कल क्रमांक ०५०४७०/डी.एन. नगर विभाग असा आहे. ते दिनांक ०३/१०/२०१९ ते दिनांक ०१/०५/२०२० रोजी पर्यत कर्तव्यावर गैरहजर असून गैरहजर कालावधीत अटक आरोपी **संतोष बापूराव राठोड वय ३५ वर्षे व इतर ०९ आरोपीतांनी** एकत्रित येवून फिर्यादी यांची सोन्याचे दागिने बनविणारी कंपनीत घरफोडी चोरी करण्याचा कट करुन त्याप्रमाणे योजना आखून घरफोडी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तपासाची गुंतागुंत :–

१. सदरचा गुन्हा दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० रोजीचे दरम्यान लॉकडाऊनचे कालावधीत घडल्याने नक्की कोणत्या दिवशी घरफोडी झाली याबाबत माहिती घेणे आवश्यक होते.
२. सदर गुन्हा हा अज्ञात चोरटयांनी केला होता.
३. गुन्हयाचे घटनास्थळ हे दोन मजली इमारतीमध्ये असून अज्ञात चोरटयांनी कंपनीचे छतावरील सिमेंट पत्रा तोडून फिर्यादी यांचे कंपनीत प्रवेश केला होता. त्यामुळे चोरटे इमारतीचे गच्चीवर कसे पोहचले याबाबत माहिती घेणे आवश्यक होते.
४. लोखंडी तिजोरी कापण्याकरीता सुमारे तीन तास इलेक्ट्रीक कटरचा वापर होऊन देखील त्याचा आवाज कंपनीचे सुरक्षा रक्षक यांचेपर्यत कसा पोहचला नाही याबाबत शंका होती.
५. गुन्हयाचे घटनास्थळी असलेले सी.सी.टि.व्हि. डि.व्ही.आर. हे देखील चोरटयांनी काढून घेऊन गेल्याने चोरटयाबाबत माहिती मिळणे अवघड झाले होते.
६. नमुद गुन्हयाचा कट पोलीस दलातील कर्मचारी यानेच रचून त्याप्रमाणे इतर आरोपीतांना चिथावणी देवून घरफोडी चोरी झाल्याने गुन्हयाची उकल करणे अवघड होते.

सदरचा गुन्हा घडला त्यावेळी जनमनांवर उमटलेले पडसाद :–

१. एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, मुंबईचे हद्‌दीमध्ये असंख्य सोने व हिरे दागिने बनविण्याच्या कंपन्या असून सात करोड पेक्षा जास्त किंमतीच्या दागिन्यांची चोरी झाल्यामुळे दागिने बनविणाऱ्या व्यवसायिकामध्ये असुरक्षितेची व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सदरचा गुन्हा घडल्यानंतर असंख्य व्यापारांनी लॉकडाऊन कालावधीमध्ये त्यांच्या कंपनीतील मालमत्तेची पडताळणी करून नमुद दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपीतांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली होती.

सुरक्षितता, सार्वजनिक सुव्यवस्था व पोलीस दलाची प्रतीमा सुधारण्यामध्ये मदत होऊ शकेल असा कोणताही महत्वाचा मुद्‌दा जो निवड समितीस योग्य वाटेल

१. सदरचा गुन्हा दिनांक २२/०४/२०२० रोजी दाखल झाला असून दिनांक २७/०४/२०२० रोजी उघडकीस आणून गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालमत्तेपैकी ९१.१५ टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात आल्याने गुन्हयातील फिर्यादी व इतर व्यवसाईक यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन जनमानसातील पोलीसांची प्रतिमा उंचावली आहे.
२. नमुद गुन्हयात पोलीस दलातील कर्मचाऱ्यास देखील अटक करून त्याच्याकडून नमुद गुन्हयातील चोरीची मालमत्ता हस्तगत करून कायदा हा सर्वासाठी समान असल्याचे दाखविल्याने पोलीस दलाची प्रतिमा सुधारण्यास मदत झाली आहे.

## 'प्रपत्र ब'

### मुख्य तपासी अधिकारी यांचे नांव :— पो.नि. दिपक सुर्वे (मोबाईल क्र. ७०२१५८८२००)

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे/शाखा | एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | गु.र.क्र. २५१/२०२० कलम ४५४,४५७,३८०,१०९,१२०(ब),३४ भा.द.वि. |
| फिर्यादी | श्री. राजकुमार तिलकराज लुथरा, वय ५७ वर्षे, धंदा— व्यवसाय, राठी— ६०२/ १०, लोढा एटर्निस, भंगारवाडी, एम.आय.डी.सी., अंधेरी पुर्व, मुंबई. |
| गुन्हा घडला दिनांक | दिनांक १९/०३/२०२० रोजी रात्रौ २०.०० वा. ते<br>दिनांक २२/०४/२०२० रोजी १५.०० वा. दरम्यान |
| गुन्हा उघड दिनांक | दिनांक २७/०४/२०२० रोजी |
| बळीत/मयत | निरंक |
| गुन्हयाचे ठिकाण | सोना ओव्हरसिज, गाळा नं. ११०, निरज इन्डस्ट्रिज इस्टेट, सनफार्मा समोर, महाकाली रोड, अंधेरी पुर्व, मुंबई. |
| चोरीस गेला माल | रूपये ७,०९,४८,९९२/— किंमतीची मालमत्ता त्यात हिरेजडीत सोन्याचे दागिने, हिरे, सोने मिश्रीत माती ( गोल्ड डस्ट) |
| हस्तगत माल | १) हिरे — किंमत रूपये ३,८२,७३,७२५/—<br>२) हिरेजडीत सोन्याचे दागिने — किंमत रूपये २,१९,०४०७२/—<br>३) गोल्ड डस्ट — किंमत रूपये ४४,९१,५००/—<br>०१) एकुण किंमत रु. ६,४६,६९,२९७/—<br>०२) ग्राईंडर कटर मशीन किंमत रुपये २,०००/—<br>०३) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 48 AR 0041 कि. रु. ३०,०००/—<br>०४) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 47 S 2840 कि. रु. ३०,०००/— |
| आरोपींचे नावे | १) विपुल आनंदा चांबरिया, वय ३५ वर्षे,<br>२) लक्ष्मण नरसप्पा दंडू वय ३५ वर्षे,<br>३) शंकर कुमार येशु, वय ४२ वर्षे,<br>४) राजेश शैल्लु मारपक्का,वय २९ वर्षे,<br>५) विकास तुळशीराम चनवादी, वय २४ वर्षे, .<br>६) मुन्नाप्रसाद हिरालाल खैरवार, वय ४९ वर्षे,<br>७) धिमंत छोटालाल चौहाण, वय ३२ वर्षे,<br>८) इरफान लतीफ मुलाणी. वय ३४ वर्षे,<br>९) संतोष बापूराव राठोड वय ३५ वर्षे,<br>१०) पंकज रामनिवर गौड, वय ३५ वर्षे, |

<table>
<tr><td>अटक दिनाकं</td><td>०१) आरोपी क्र. १ ते ५ यांना<br>दिनांक २७/०४/२०२० रोजी १५.४५ वा. अटक<br>०२) आरोपी क्र. ६ व ७ यांना<br>दिनांक २८/०४/२०२० रोजी १८.०० वा. अटक<br>०३) आरोपी क्र. ८ यास<br>दिनांक ३०/०४/२०२० रोजी १३.३५ वा.अटक<br>०४) आरोपी क्र. ९ यास<br>दिनांक ०१/०५/२०२० रोजी १९.३० वा. अटक<br>०५) आरोपी क्र. १० यास<br>दिनांक ०३/०५/२०२० रोजी १४.२५ वा. अटक</td></tr>
<tr><td>हेतु</td><td>घरफोडी चोरी करणे.</td></tr>
<tr><td>पध्दत</td><td>कंपनीचे वरील छत तोडून कंपनीमध्ये प्रवेश करून लोखंडी तिजोरी ग्राईडर कटर मशीनाच्या सहाय्याने कापून चोरी करणे.</td></tr>
<tr><td rowspan="4">पुराव्याचा प्रकार</td><td>प्रत्यक्षदर्शी – निरंक</td></tr>
<tr><td>अप्रत्यक्षदर्शी – २० पंच व ०८ इतर पूरक साक्षिदार</td></tr>
<tr><td>वस्तूनिष्ठ –<br>घटनास्थळ पंचनामा –<br><u>हस्तगत वस्तूंची नावें –</u><br>१) हिरे – किंमत रूपये ३,८२,७३,७२५/–<br>२) हिरेजडीत सोन्याचे दागिने – किंमत रूपये २,१९,०४०७२/–<br>३) गोल्ड डस्ट – किंमत रूपये ४४,९१,५००/–<br><u>०१) एकुण किंमत रुपये ६,४६,६९,२९७/–</u><br>०२) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 48 AR 0041 कि. रु. ३०,०००/–<br>०३) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 47 S 2840 कि. रु. ३०,०००/–<br><br>भापुका २७ मेमोरडंम पंचनामा – ०४<br><br><u>हस्तगत हत्यार/माल व त्याची किंमत :–</u>
<table>
<tr><td>हिरेजडीत सोन्याचे दागिने, हिरे व गोल्ड डस्ट</td><td>रु. ६,४६,६९,२९७/–</td></tr>
<tr><td>ग्राईडर कटर मशीन व ०२ ॲक्टीव्हा स्कुटर</td><td>रु. ६२,०००/–</td></tr>
<tr><td>एकुण</td><td>रू. ६,४७,३१,२९७/–</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>शास्त्रौक्त – सी.डी.आर व इतर शास्त्रीय पुरावे</td></tr>
</table>